**इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी.**

आस्थापना व सामान्य प्रशासन विभाग

**Walk in Interview Notice**

इचलकरंजी महानगरपालिकेच्या उद्यान व वनसंवर्धन विभागाकडील उद्यान पर्यवेक्षक पदाचे (जागा एक फक्त) विवक्षित कामकाजासाठी खालील अर्हताप्राप्त उमेदवारांकडून तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पद्धतीने मासिक मानधन तत्वावर नियुक्तीकामी अर्ज मागविणेत येत आहेत.

**आवश्यक अर्हता** -

अ) मान्यताप्राप्त कृषि विद्यापीठाची बी.एससी. (हाटीकल्चर्स) अॅग्रीकल्चर बी.एससी. फॉरेस्ट्री पदवी

ब) शासकीय/निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थाकडील समकक्ष पदावरील किमान ०३ वर्षाचा अनुभव धारण करणा-या उमेदवारास प्राधान्य.

**अटी / शर्ती**

१) कंत्राटी पद्धतीने _ मासिक मानधन तत्वावर देण्यात आलेली नियुक्ती ही रुजू दिनांकापासून सहा महिने किंवा म.न.पा.मंजूर आकृतीबंधातील उद्यान पर्यवेक्षक हे पद नामनिर्देशनाने भरती करेपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीकरिता असेल आणि या मुदतीत कामकाजाचे मूल्यमापन करून कामकाज समाधानकारक असेल तर आणि आवश्यकतेनुसार पुढील कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात येईल आणि यासंबंधी मा. आयुक्त यांचे निर्णय अंतिम असतील.

२) कंत्राटी पद्धतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे उमेदवारास म.न.पा. / शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे / सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार / हक्क नसेल, तसेच यासाठी कोणताही दावा / वाद निर्माण करता येणार नाही.

३) मा.आयुक्त यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी सदर कंत्राटी तत्वावरील नियुक्ती रद्द करण्याचे अधिकार असतील.

४) सोपविण्यात आलेले कामकाज / सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल,अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेली असणार नाही किंवा असे कोणतेही हितसंबंध असणार नाहीत.

५) कोणतेही Conflict of Interest ( हितसंबंध) असल्यास ते जाहीर करण्याची जबाबदारी असेल.

६) सोपविण्यात आलेल्या कामकाजाशी संबंधित प्राप्त होणारी कागदपत्रे / माहिती व आधारसामुग्रीबाबत पूर्णत: गोपनीयता पाळण्याची व सोपविण्यात आलेले कामकाज निश्चित कालावधीत पूर्ण करण्याची जबाबदारी उमेदवाराची असेल. तसेच कामकाजाबाबत, नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेवून कामाचे मूल्यमापन करतील.

७) सदर नियुक्तीच्या अनुषंगाने मासिक रक्कम रु. २५,०००/- इतके मानधन देय असेल.

८) वरीलपैकी कोणत्याही अटी / शर्तीचा भंग झाल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता नियुक्ती रद्द करण्यात येईल.

तरी इच्छुकांनी त्यांचे अर्ज व अर्हता/अनुभव विषयक कागदपत्रांसह (मूळ व छायांकित प्रती) दिनांक १४.०५.२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता निम्नस्वाक्षरीत यांचे कार्यालयात उपस्थित रहावे.

(सुषमा शिंदे-कोल्हे)
अति.आयुक्त,
इचलकरंजी महानगरपलिका.

इचलकरंजी महानगरपालिका स्थापना २०२२

नि.प्र., माहिती तंत्रज्ञान विभाग
/- म.न.पा. संकेतस्थळावर प्रसिद्ध करुन अहवाल घ्यावा.

नाईक हवालदार,
/- म.न.पा. नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करुन अहवाल घ्यावा।

AMC, GAD, 08.05.2026